# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १५.०८.२०२६ शनिवार**

**पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत ''स्मार्ट पोलीस चौकी'' चा उद्घाटन कार्यक्रम संपन्न :—**

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधुन, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत बिट क्र. १, सरदार वल्लभभाई पटेल मैदान (कच्छीविसा परीसर) वर्धमाननगर येथे नागरीकांच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने, अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज ''स्मार्ट पोलीस चौकी'' चे उद्घाटन आज दिनांक १५.०८.२०२६ चे ०३.३० वा. चे सुमारास, मा. महसुल मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपुर जिल्हा श्री. ना. चंद्रशेखर बावणकुळे यांचे शुभहस्ते मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे, महापौर म.न.पा. नागपुर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांचे हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आली.

स्मार्ट पोलीस चौकीमध्ये सिसिटीएनएस प्रणाली सुरू राहणार असुन, तेथे नागरीकांच्या तक्रारी स्विकारणे, नोंद करणे व आवश्यकतेनुसार तात्काळ पोलीस मदत उपलब्ध करून देणे अशा सुविधा सुरू राहणार आहेत. चौकी पुर्णपणे डिजीटल व अत्याधुनिक स्वरूपाची असुन चौकीमध्ये संगणक, प्रिंटर, सिसिटीएनएस प्रणालीकरीता आवश्यक उपकरणे, इंटरनेट व विद्युत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. चौकी परिसरात एकुण ०८ सिसिटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले असुन, त्यामुळे महत्वाचे ठिकाणावर निगराणी ठेवण्यास मदत होणार आहे. आपात्कालीन परीस्थीतीत तात्काळ मदत देण्यासाठी आवश्यक संपर्क सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. चौकीमध्ये नागरीकांकरीता स्वच्छतागृह, स्वतंत्र बैठक व्यवस्था, पिण्याचे पाणी सुविधा उपलब्ध असुन चौकीचा परिसर स्वच्छ व सुशोभित निर्मीत करून, वृक्षारोपन करून सुशोभित करण्यात आला आहे. वर्धमान नगर व कच्छीविसा परिसरातील नागरीकांना तंत्रज्ञानाधारीत तत्पर प्रभावी व पारदर्शक पोलीस सेवा उपलब्ध करून देणे हा स्मार्ट पोलीस चौकीचा मुख्य उद्देश असुन, या माध्यमातुन गुन्हेगारी प्रतीबंध, नियीमत गस्त, निगराणी, त्वरीत कारवाई यावर भर देण्यात येणार आहे. स्मार्ट पोलीस चौकीमुळे पोलीस व नागरीक यांचेतील समन्वय अधिक दृढ होवुन, ''नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी सदैव तत्पर पोलीस'' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यास मदत होणार आहे.

स्मार्ट पोलीस चौकीच्या उभारणीचे नियोजन व प्रत्यक्ष कार्यासाठी मा. आमदार श्री. कृष्णा खोपडे यांचे सहकार्याने श्री. नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर, सत्तापक्ष नेता म.न.पा. नागपुर यांचे विशेष सहकार्य लाभलेले आहे.

कार्यक्रमाकरीता श्री. कृष्णाजी खोपडे, आमदार (पुर्व नागपूर), श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, श्री. विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), महानगर पालीका आयुक्त श्री. विपीन ईटनकर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग), मा. श्री. मुकुंद कवाडे वपोनि. लकडगंज, मा. श्री. मनोज चौधरी पोनि. गुन्हेशाखा, बिट चे अधिकारी व अंमलदार व ईतर पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच मनपा येथील कार्यरत नगरसेवक व माजी नगरसेवक तसेच प्रतिष्ठीत नागरीक उपस्थित होते.






**(कामगिरी)**

**<u>१) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— अवैध हुक्का पार्लर चालक आरोपीविरूध्द गुन्हे दाखल.</u>**

दिनांक १५.०८.२०२६ चे ०४.३० वा. ते ०५.३० वा. चे सुमारास, एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत, विजय आर्केड अपार्टमेंट शिवाजी नगर येथील 'कुलाबा कॅफे' येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे कॅफे मॅनेजर आरोपी क्र. १) अभय प्रमोद राव, वय ३४ वर्षे, रा. ए/३, मॉईल भवन, छावणी, नागपूर हा त्याचे साथीदार आरोपी क्र. २) अनिकेत ईश्वर रामटेके, वय २९ वर्षे, रा. हिलटॉप, कालीमाता मंदीर जवळ, ३) आकाश देवानंद पावणे, वय २४ वर्षे, रा. सावली, खापरेखेडा, जि. नागपुर यांचे मदतीने १६ ग्राहकांना शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आले. आरोपी क्र. १ यास विचारणा केली असता, कॅफेमालक समीर शेख नावाचा ईसम असल्याचे त्याने सांगीतले. आरोपी हे संगणमताने विनापरवाना स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखुजन्य पदार्थ व ईतर साहित्य असा एकुण ३६,९१५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कॅफेमालक, मॅनेजर, वेटर व ग्राहक असे एकूण २० आरोपींचे विरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे कलम २७४ भा.न्या.सं., सहकलम ५,७,२० सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम—२००३, महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम—२०१८, सहकलम ३३ आरडब्ल्यु १३१ मपोका. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात सपोनि. भगवान कोळी, पोहवा. अनुप लोलुसरे, पोअं. अर्शद शेख, योगेश सोनवणे, साहील भोयर, प्रविण, लक्ष्मीकांत व मपोअं. श्वेता पाटील, पोलीस ठाणे अंबाझरी येथील पोउपनि. नानाभाऊ काकड, पोहवा. बलजीत ठाकुर यांनी केली.

**२) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १४.०८.२०२६ चे २२.२० वा. ते २२.५० वा. चे दरम्यान, एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे अजनी हद्दीत, रामटेके नगर, गल्ली नं. ३ येथे राहणारी महीला नामे सोनु राहुल मेश्राम, वय ३४ वर्षे हीचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तीचे ताब्यात राहते घरातील बाथरूममध्ये भिंतीला तयार केलेला कप्पा (गुप्त जागा) येथे विदेशी दारू इम्पेरियल ब्ल्यु १८० मि.ली. च्या ४८ नग बॉटल मिळुन आल्या. तसेच, गल्ली नं. ४, रामटेके नगर येथे राहणारी महीला नामे माया राजु रंगारी, वय ५८ वर्षे हीचे राहते घरी रेड कारवाई केली असता, तीचे ताब्यातुन विदेशी दारू रॉयल स्टॅग १८० मि.ली. च्या ९६ नग बॉटल तसेच, देशी दारू ९० मि.ली. च्या १०५ नग बॉटल व दारू विक्री चे २१,२३०/—रू रोख असा मुद्देमाल मिळुन आला. दोन्हीही महीला आरोपींचे ताब्यातुन एकुण ६१,०४०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी ह्या अवैद्यरित्या दारूचा साठा बाळगुन समक्ष मिळुन आल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे अजनी येथे कलम ६५(इ) महा. दारूबंदी कायदा अन्वये वेगवेगळे गुन्हे नोंदविले आहेत. दोन्हीही महीला आरोपींना मुद्देमालासह अजनी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात सपोनि. भगवान कोळी, पोउपनि. परमेश्वर आगासे, सिध्दांत म्हस्के, पोहवा. विजय गिरी, आशिष गायधने, मनोज निमकर, दिनेश क्षिरसागर, प्रफुल्ल धरमाळे व मपोअं. श्वेता पाटील यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे सदर :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपींना अटक.**

फिर्यादी दिपक हरीचंद्र सिरसवार, वय ४५ वर्षे, रा. धरमपेठ, गवळीपुरा, व्हिआयपी रोड, नागपुर यांचा लहान भाऊ नामे चंदन हरीचंद्र सिरसवार, वय ४३ वर्षे यांचा दुधाचा धंदा असुन, त्यांचे जनावरांचा गोठा पोलीस ठाणे सदर हद्दीत तेलंगखेडी, गजानन मंदीरमागे आहे. दिनांक १४.०८.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा भाऊ चंदन हा रामगिरी झोपडपट्टी जवळील पुलाजवळ असलेल्या पानठेल्याजवळ बसलेला असतांना, ई—रिक्षा चालक नामे सागर भोंडेकर याचे रिक्षाने बिसन राऊतचे चहानाश्ता दुकानाची तिरपाल फाटल्याने चंदन याने रिक्षाचालक सागर यास शिवीगाळ केली होती. याच कारणावरून आरोपी रिक्षाचालक नामे १) सागर सुरेश भोंडेकर, वय २७ वर्षे, रा. विकास नगर, डब्ल्युसिएल ऑफीस जवळ, तेलंगखेडी याने त्याचे साथीदार २) ऋषीकेश राजेंद्र कनोजिया, वय १९ वर्षे, रा. डब्ल्युसिएल ऑफीस जवळ, धोबीघाट झोपडपट्टी, सिव्हील लाईन, सदर, ३) राहुल उर्फ झिंग्या मनोहर सलामे, वय १९ वर्षे, रा. रामगिरी झोपडपट्टी, सिव्हील लाईन, सदर व विधीसंघर्षग्रस्त बालक यांचेसोबत संगणमत करून, २३.३० वा. चे सुमारास फिर्यादीचा भाऊ त्याचे दुचाकीने

रामगिरी झोपडपट्टी जवळील पुलावरून घरी जात असतांना त्यास जिवे ठार मारण्याचे उद्येशाने सिमेंटचे गट्टु ने वार करून गभिर जखमी केले. जखमी यांना उपचाराकरीता, मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे सदर येथे सपोनि. दिगांबर राठोड यांनी आरोपींविरुध्द कलम १०३(१),१८९(१),१९० भान्यासं. अन्वये गुन्हा दाखल करून, तपास पथकासह शोध घेवुन गुन्ह्यातील आरोपी क्र. २ व ३ यांना अटक केलेली आहे. तसेच, एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेतलेले आहे. आरोपी क्र. १ व ईतरांचा शोध सुरू आहे. पुढील तपास सपोनि. नितीन विठोले ९८२३४४२१८० हे करीत आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे लकडगंज</u> :-** दिनांक १५.०८.२०२६ चे १२.१५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, चितार ओळी मेट्रो स्टेशन खाली, पिल्लर नं. १०५ समोर, अक्षतम शॉपचे बाहेरील पायरीवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतक हे परीसरात भिक्षा मागुन उदरनिर्वाह करीत असल्याचे परीसरातील लोकांनी सांगीतले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे लकडगंज येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी कुणाल कुंदन कोचे, वय ३९ वर्षे, रा. न्यु इंदोरा, जरीपटका, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे मपोउपनि. सोनल शिंदे ९८९२२६८६२४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/-**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## <u>वाहतुक शाखेची प्रेसनोट-१</u>

वाहतूक परिमंडळ इंदोरा नागपूर शहर हद्दीतील अंसारी इरेक्टर्स कंपनी तर्फे भोला शाळा ते कडबी चौक पर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम ३० दिवसात करण्यात येणार आहे. काम सुरळीतपणे पार पाडण्यासाठी वाहनांची वाहतूक तात्पुरती वळविणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**मोमिनपूरा ते कडबी चौकाकडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- मोमिनपुरा ते कडबी चौकाकडे जाणारी वाहतूक भोला शाळा येथुन उजवे वळण घेवून बेलिशॉप क्वॉर्टर मार्गे कामठी रोड येथुन डावे वळण घेवून कडबी चौकाकडे जाईल.

**कडबी चौक ते मोमिनपूरा कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- कडबी चौक ते मोमिनपूरा चौकाकडे जाणारी वाहतूक ही कडबी चौक येथुन डावे वळण घेवून बेलीशॉप क्वॉर्टर येथुन उजवे वळण घेवुन बेलीशॉप क्वॉर्टर मार्गे भोला ाळा येथुन डावे वळण घेवून मोमिनपूरा कडे जाईल.

**सदर अधिसुचना दिनांक १६.०८.२०२६ रोजीपासून ते दि. १४.०९.२०२६ रोजीपर्यत अंमलात राहील.**

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

## <u>वाहतुक शाखेची प्रेसनोट–२</u>

मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराश्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्र. अपोमसं(वा) /४५/नियो/३१०५/२०१९ दिनांक २०.१०.२०१९ अन्वये पारीत केलेल्या अधिसुचेनेनुसार रस्ते अपघात आणि त्यामध्ये होणाऱ्या मृत्युमध्ये दरवर्षी १० टक्के घट करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्याअर्थी नागपूर शहरातील अपघातांची कारणे पाहता सदरचे अपघात हे निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहने चालविल्यामूळे होत असून त्यामध्ये निष्पाप लोकांचे नाहक बळी जात आहेत व अनेक लोक गंभीर जखमी होवून, त्यांना कायमचे अपंगत्व येत आहे. त्यामुळे होणारे अपघातांवर आळा घालने अत्यंत आवश्यक असून, त्याकरीता शहरातील सुधारीत सिमेंन्ट रस्ते तसेच, इन्नर व आऊटर रिंगरोड वरून चालणाऱ्या वाहनांसाठी वेग मर्यादा निश्चित करणे गरजेचे आहे. करीता खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे.

• यापुर्वी निर्गमीत झालेली अधिसुचना क्र. पोउपआ/वावि/अधि.वेगमर्यादा/१००४/२०१७ दि. ०९.०३.२०१७ प्रमाणे ठरविण्यात आलेली खालील वाहनांबाबतची वेगमर्यादा रद्द करण्यात येत असून, शहरातील सध्याची लोकसंख्या, वाहनसंख्या तसेच, रस्ते व वाहतूकीची सद्यस्थिती पाहता वाहनांवर खालील प्रमाणे वेग मर्यादेचे बंधन घालण्यात येत आहे.

| महाराष्ट्र राज्यातील वाहनांसाठी अनिर्वाय करण्यात आलेली वेग मर्यादा कि. मी./प्रतितास | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | वाहनांचा प्रकार | प्रवेश नियंत्रण असलेले द्रुतगती मार्ग | | राष्ट्रीय/राज्य महामार्गावर 4 (2+2) अथवा जास्त मार्गिका असणारे विभाजीत (रस्त्याच्या मध्यभागी विभाजक असलेले मार्ग) | | महानगरपालीका कार्यक्षेत्रामध्ये मधील द्रुतगती मार्ग आणि 6 (3+3) मार्गिका असणारे विभाजीत रस्ते | | राष्ट्रीय/राज्य महामार्गावर 2 अथवा जास्त मर्गिकेचे विभाजक नसलेले रस्ते व महानगर पालीका कार्यक्षेत्रामधील 4 (2+2) मार्गिका असणारे विभाजीत रस्ते | | नगरपालीका क्षेत्रातील रस्ते/इतर रस्ते | |
| | | समतल भाग | घाट भाग | समतल भाग | घाट भाग | समतल भाग | घाट भाग (लागू असल्यास) | समतल भाग | घाट भाग | समतल भाग | घाट भाग |
| (1) | (2) | (3) | | (4) | | (5) | | (6) | | (7) | |
| | प्रवासी मोटार वाहने ज्यांचा उपयोग वाहन चालकांसह 8 प्रवासी यांचे वाहतूकीसाठी केला जातो. (एम. 1 श्रेणीतील वाहने) | 100 | 60 | 90 | 50 | 80 | 40 | 70 | 40 | 60 | 40 |
| | प्रवासी मोटार वाहने ज्यांचा उपयोग वाहन चालकांसह 9 किंवा त्यापेक्षा जास्त प्रवासी यांचे वाहतुकीसबंधी केला जातो. ( एम 2 आणि एम 3 श्रेणीतील वाहने) | 80 | 40 | 80 | 40 | 60 | 40 | 60 | 40 | 50 | 30 |
| | मोटार वाहने ज्यांचा उपयोग माल/सामान वाहतूकीसाठी केला जातो. (सर्व एन श्रेणीतील | 80 | 40 | 80 | 40 | 60 | 40 | 60 | 40 | 40 | 30 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वाहने) | | | | | | | | | | |
| | दुचाकी मोटर वाहने | परवानगी नाही | परवानगी नाही | 70 | 40 | 60 | 40 | 60 | 40 | 50 | 40 |
| | चारचाकी मोटर रिक्षा | परवानगी नाही | परवानगी नाही | 60 | 40 | 60 | 40 | 60 | 40 | 40 | 30 |
| | तीनचाकी मोटर वाहने/रिक्षा | परवानगी नाही | परवानगी नाही | 60 | 40 | 50 | 40 | 50 | 40 | 40 | 30 |

**सदर अधिसुचना दि. १७.०८.२०२६ रोजीपासून ते दिनांक १६.०९.२०२६ रोजीपर्यंत अंमलात राहील.**

सदरहु अधिसूचना एक महिन्याच्या कालावधीसाठी पारित करण्यात येत असून, त्याबाबत नमूद कालावधीत नागरीकांकडून जर काही हरकती व सुचना प्राप्त झाल्या तर त्याचा विचार करून पून्हा अधिसूचना काढताना केला जाईल.

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

## वाहतुक शाखेची प्रेसनोट—३

वाहतूक परिमंडळ सिताबर्डी नागपूर शहर हद्दीतील महा. मेट्रो तर्फे मे. YFC & BBG Projects कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन ते इन्स्टीट्युट ऑफ सासन्स कॉलेज (डी.पी.रोड) पर्यंत भुयार मार्गाचे बांधकाम सतत ०१ वर्षात करण्यात येणार आहे. सदरच्या मार्गावर व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये तसेच, रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्याकरीता नमुद रस्त्यावरील वाहतूक वळविणे आवश्यक आहे, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडुन इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) ते इन्स्टीट्युट ऑफ सासन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडे जाणारी वाहतुक ही डावे वळण घेवुन व्हेरायटी चौक येथुन उजवे वळण घेवुन पुढे महाराजबाग चौकातुन सोयीनुसार किंवा झिरो माईल येथुन डावे वळण घेवुन फॉरेस्ट ऑफिस मार्गे इन्स्टीट्युट ऑफ सायन्स चौकाकडे जातील.

**इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडे जाणारी वाहतुक महाराजबाग चौकातुन डावे वळण घेवुन व्हेरायटी चौक मार्गे फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) कडे जातील किंवा बोर्ड ऑफिस चौक येथुन उजवे वळण घेवुन फॉरेस्ट ऑफिस मार्गे झिरो माईल येथुन उजवे वळण घेवुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) चौकाकडे जातील

सदर अधिसुचना दिनांक १६.०८.२०२६ रोजीपासून ते दिनांक १४.०९.२०२६ रोजीपर्यत अंमलात राहील.

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

**स्वा/—**

**( आदित्य मिरखेलकर, भापोसे )**

पोलीस उप आयुक्त, वाहतूक,

नागपूर शहर.